नांदेड : हिमायतनगर–भोकर राष्ट्रीय महामार्गावरील सोनारी फाटा येथे भरधाव चारचाकी वाहनाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक दिल्याची भीषण घटना शनिवार, दि. २५ जुलै रोजी दुपारी १२ ते १२.३० वाजण्याच्या सुमारास घडली. या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. हिमायतनगरकडून भोकरच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या चारचाकी वाहन क्रमांक एमएच २६ सीपी ८८६० ने सोनारी फाटा येथे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन दुचाकींना जोरदार धडक दिली. या धडकेत टीएस १८ जी १८१७ आणि एमएच २६ बीएस ५२६९ क्रमांकाच्या दुचाकींचे मोठे नुकसान झाले. या घटनेत सोनारी येथील शेख जिकरान शेख सिराज आणि शेख सोहेल शेख जहीर हे दोघे गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने मदत करत जखमींना सरसम येथील प्राथमिक रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही पुढील उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले. मात्र, नांदेडला नेत असताना शेख सोहेल शेख जहीर यांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. तर शेख जिकरान शेख सिराज यांच्यावर नांदेड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच हिमायतनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, बीट जमादार नागरगोजे, बालाजी जाधव, पठाण आदींनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. हिमायतनगर–भोकर राष्ट्रीय महामार्गावर सोनारी फाट्यासह अनेक गावांच्या मुख्य चौकात आणि बसथांब्यांजवळ स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## ठाण्यात 'मागेल त्याला काजू कलमे' योजनेचा शुभारंभ; महाडीबीटीवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

ठाणे (जिमाका):-महाराष्ट्रातील प्रमुख फळबाग पिकांपैकी एक असलेल्या काजू लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी आणि जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी कृषी विभागाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत मागेल त्याला काजू कलमे ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. हवामान बदलाच्या या काळात कमी पाण्यात आणि कमी खर्चात दीर्घकालीन उत्पन्न देणारा एक सुरक्षित पर्याय म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. ठाणे जिल्ह्यातील डोंगराळ, उताराच्या तसेच हलक्या व पडीक जमिनींमध्ये काजू लागवड अत्यंत यशस्वी ठरत असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे यांनी केले आहे. सध्या भारतात १०.६२ लाख हेक्टर क्षेत्रावर काजूची लागवड केली जात असून त्यातून वार्षिक ८.१७ लाख मेट्रिक टन इतके उत्पादन मिळते. या उत्पादनात महाराष्ट्राचा, विशेषतः कोकणाचा मोठा वाटा आहे. हीच उत्पादकता आणि क्षेत्र आणखी वाढवण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील सीळ्डींरलज्ञ ऋशीाशी खऊ व आधार नोंदणीकृत शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत समाविष्ट केले जाणार आहे. या योजनेची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ७/१२ उताऱ्यावर अनेक खातेदार असून स्थानिक वास्तव्याअभावी सहमती मिळणे कठीण असल्यास, प्रत्यक्ष जमीन वापरणाऱ्या स्थानिक शेतकऱ्याला किंवा वारसदाराला या योजनेचा थेट लाभ दिला जाणार आहे. याशिवाय वनपट्टेधारक शेतकरी आणि १० वर्षांपूर्वी शासकीय योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थीदेखील यास पात्र ठरणार आहेत.

या योजनेअंतर्गत सहभागी लाभार्थ्याला प्रति व्यक्ती किमान १० आणि कमाल ५० काजू कलमे मोफत पुरवली जाणार आहेत. कृषी विभागातर्फे दिली जाणारी ही कलमे स्थानिक हवामानाशी सुसंगत, सुधारित आणि उच्च उत्पादनक्षम वाणाची असून त्यांची बाजारपेठेतील किंमत ७० रुपये प्रति कलम इतकी आहे. शेतकरी आपल्या मोकळ्या पडीक जमिनीसह शेताच्या बांधावरही ही कलमे लावू शकतात. शासनाने सन २०२५-२६ या वर्षापासून महाडीबीटी पोर्टलवर 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' हा नियम लागू केला आहे. त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी विनाविलंब महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करावी.

# 'मोदींच्या विरोधात त्यांच्यात पक्षात अस्वस्थता' याचा फायदा त्या लोकांनी घेतला असावा : शरद पवार

पुणे : नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू असताना आज त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले, ''हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे.''

लोकशाहीच्या ताकदीचे प्रतीक : पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार म्हणाले की, नीट पेपरफुटी प्रकरणी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सलग २८ दिवस विद्यार्थ्यांनी दिलेला लढा आणि दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी आहे. आंदोलकांच्या आग्रही मागणीनुसार अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला. दडपशाहीला न घाबरता अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहून सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारण्यास भाग पाडणारा हा लढा लोकशाहीच्या ताकदीचे प्रतीक आहे. हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे. तसंच, विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी युवकांना नैतिक आणि संसदीय पाठबळ दिल्याबद्दल सर्व विरोधी पक्षांच्या खासदारांचे त्यांनी आभार मानले. ''देशातील लोकशाहीनं नव्याने कात टाकली असून, त्याचं श्रेय देशातील युवा पिढीला जातं.''

लोकशाहीत संवादाचं महत्त्व : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याबाबत विचारलं असता शरद पवार म्हणाले, ''मी पंतप्रधानांना लोकशाहीत संवादाचं महत्त्व पटवून दिलं. विद्यार्थ्यांशी संवाद साधणं आवश्यक आहे आणि त्यांच्या मागण्यांवर गांभीर्यानं विचार व्हावा आणि राजीनामा घेतला पाहिजे, असं सांगितलं. सरकार संवादासाठी तयार असेल तर चर्चा व्हावी, असं मी अभिजित दिपके यांनाही सांगितलं होतं. विद्यार्थ्यांचा आग्रह पंतप्रधान आणि शिक्षणमंत्र्यांनी मान्य केला आणि आज शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला. हे नव्या पिढीच्या सामूहिक लढ्याचं यश असून मी त्यांचं अभिनंदन करतो.''

शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला : दिल्लीतील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला. तसंच, मेट्रोची एक लाईन बंद करण्यात आल्यानं सामान्य नागरिकांनाही त्रास सहन करावा लागला. हे आंदोलन केवळ जंतर-मंतरपुरतं मर्यादित राहिलं नाही, तर देशभर आणि परदेशातही त्याचे पडसाद उमटले. भारतातील तसंच परदेशातील भारतीय युवकांनी शांततेच्या मार्गानं आंदोलन केलं. देशभरातून विद्यार्थी दिल्लीत एकत्र आले आणि त्यांच्या एकजुटीची दखल घेत अखेर शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला, असं शरद पवार म्हणाले.

## शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा हीच खरी ईश्वरी सेवा' : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जळगाव : ''सामान्य नागरिकांना महसूल सेवा जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असून, नागरिकांच्या चेहऱ्यावरील समाधान हेच प्रशासनाच्या कार्याचे खरे यश आहे. प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाच्या सेवा वेळेत पोहोचल्या पाहिजेत. शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करणे हीच खरी ईश्वरी सेवा आहे,'' असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. ते धरणगाव येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान' अंतर्गत भव्य समाधान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, एरंडोल उपविभागीय अधिकारी मनीषकुमार गायकवाड, जळगाव उपविभागीय अधिकारी विनय गोसावी, तहसीलदार महेंद्र सूर्यवंशी, शीतल राजपूत, गटविकास अधिकारी चंद्रकांत बोडरे, सागर कोल्हे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण, डॉ. प्रमोद पांढरे, गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले, अजित तडवी, नायब तहसीलदार लक्ष्मण सातपुते, संदीप मोरे, श्री. वाघ, उबाठाचे संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, सचिन पवार, रवींद्र चव्हाण, मोतीआप्पा पाटील, माजी सभापती प्रेमराज पाटील, अनिल पाटील, बचत गटांच्या महिला,माजी सभापती पी.सी. आबा पाटील, जि प.चे माजी उपाध्यक्ष जानकीराम पाटील , भानुदास विसावे, नगरसेवक, सरपंच, विविध विभागांचे अधिकारी - कर्मचारी, पदाधिकारी तसेच जळगाव व धरणगाव तालुक्यातील हजारो लाभार्थी उपस्थित होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, ''एका छताखाली दोन हजारांहून अधिक लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचविणारे हे शिबिर म्हणजे लोकाभिमुख प्रशासनाचे जिवंत उदाहरण आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून 'महा राजस्व अभियान' यशाचा नवा टप्पा गाठत आहे. प्रारंभी पालकमंत्री ना. पाटील यांनी उपस्थितांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी, दीर्घायुषी व यशस्वी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जनहितकारी कार्याचे स्मरण करून प्रशासनातील प्रत्येक अधिकाऱ्याने संवेदनशीलता, उत्तरदायित्व आणि सेवाभाव जपत नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडविण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहनही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी प्रत्येक पात्र लाभार्थ्याने शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, तसेच विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सहभागी होऊन मतदार यादीतील नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन करत भविष्यात चारा टंचाई टाळण्यासाठी शिबिरात चारा पिकांच्या बियाण्यांचेही वितरण करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.


**ALNA TRADING AND EXPORTS LIMITED**

CIN: L51900MH1981PLC025145

REG. OFFICE: ALLANA HOUSE, 4 J A ALLANA ROAD, COLABA, MUMBAI - 400001

TEL: 61498000, FAX: 22044821 EMAIL: secretarial@allana.com. WEB: www.alna.co.in

**NOTICE OF THE 44th ANNUAL GENERAL MEETING, BOOK CLOSURE AND E-VOTING**

**Notice** is hereby given that the 44th Annual General Meeting ('AGM') of the Members of Alna Trading and Exports Limited ('the Company') will be held on **Thursday, August 20, 2026 at 12.00 noon at the Registered Office of the Company at Allana House, Allana Road, Colaba, Mumbai - 400 001** with physical presence of the Members in compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 and the rules made thereunder to transact the businesses that will be set forth in the Notice convening AGM.

In line with the Circulars issued by the MCA and the SEBI, the Notice of the AGM along with the Annual Report for financial year 2025-26 has been electronically sent to those Members whose e-mail addresses are registered with the Company, in addition to the physical copy of Annual Report to be sent to each Member.

The AGM Notice along with the Annual Report inter alia indicating the process and manner of e-Voting process is available on www.alna.co.in and on the website of the Stock Exchange i.e. www.bseindia.com and on the website of CDSL www.evotingindia.com.

All documents referred to in the Notice shall be made available electronically and at the registered office of the Company for inspection without any fee by the Members from the date of circulation of this Notice up to the date of the AGM. Members seeking to inspect such documents can send an email to secretarial@allana.com.

Notice is also hereby given pursuant to Section 91 of the Companies Act, 2013 ('the Act') read with Rule 10 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 42 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that the **Register of Members and Share Transfer Books of the Company will be closed from Friday, August 14, 2026 to Thursday, August 20, 2026 (both days inclusive)** for the purpose of AGM.

The Company is providing all its members with the facility to exercise their right to vote electronically on the resolutions proposed to be passed at the AGM prior to the AGM (remote e-Voting) and during the AGM (e-Voting) through CDSL. **The remote e-voting period begins on Monday, August 17, 2026 (9:00 A.M. I.S.T) and ends on Wednesday, August 19, 2026 (5:00 P.M. I.S.T).** During this period, shareholders of the Company, holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date viz. **Friday, August 14, 2026** may cast their vote electronically. The e-voting module shall be disabled by CDSL for voting thereafter.

The voting rights of the Members shall be in proportion to their share of the paid-up equity share capital of the Company as on **Friday, August 14, 2026** ('Cut-Off Date'). Any person, who acquires shares of the Company after dispatch of AGM Notice and holds shares as on the cut-off date, may obtain the login ID and password by sending a request at helpdesk.evoting@cdslindia.com by mentioning their Folio No./DP ID and Client ID No. However, if you are already registered with CDSL for remote e-Voting then you can use your existing user ID and password for casting your vote.

The facility of voting shall also be made available at the AGM by way of Ballot papers and the Members attending the AGM who have not cast their vote by remote e-voting shall be eligible to vote at the AGM. A member may participate in the AGM even after exercising his right to vote through remote e-voting but shall not be allowed to vote again at the AGM. The procedure of e-voting is available in Notice of the 44th AGM.

The Login credentials for casting votes through e-Voting shall be made available to the Members through email whose email ids are registered with RTA/Depositories. Members who do not receive email or whose email addresses are not registered with the Company's RTA/ Depositories, may generate login credentials by following instructions given in notes section to Notice of AGM, the same login credentials may also be used by Members for attending this AGM.

The Company has appointed Mr. Aqueel A. Mulla, Practicing Company Secretary, as the Scrutinizer to conduct the voting process in a fair and transparent manner.

**Registration of email and updation of bank account:**

Members who have not yet registered their email addresses and bank accounts are requested to contact the RTA i.e., MUFG Intime India Private Limited, on or before **Friday, August 14, 2026, 5.00 P.M. (I.S.T.)**, for registering their email addresses and bank accounts to receive the Notice of AGM and Annual Report electronically and to receive login ID and password for e-voting.

Members are requested to intimate changes, if any, pertaining to their name, postal address, e-mail address, telephone/mobile numbers, Permanent Account Number (PAN), mandates, nominations, power of attorney, Demat Account, Bank details such as, name of the bank and branch details, bank account number, MICR code, IFSC code, etc. as below:

| | |
|---|---|
| **Physical Holding** | Kindly submit Form ISR-1 and other forms to the Company/Registrar and Share Transfer Agent pursuant to SEBI Circular No. SEBI/HO/MIRSD/MIRSD_RTAMB/P/CIR/2021/655 dated 3rd November, 2021. Form ISR-1 is available on the website of the RTA i.e. MUFG Intime India Private Limited. https://web.in.mpms.mufg.com/KYC/index.html |
| **Electronic Holding (Demat)** | Contact their respective Depository Participant (DPs) |

If you have any queries or issues regarding e-voting and attending AGM from the CDSL e-voting system, you may refer the Frequently Asked Questions ('FAQs') and e-voting manual available at www.evotingindia.com under help section or can write an email to Mr. Rakesh Dalvi, Sr. Manager (CDSL) at helpdesk.evoting@cdslindia.com or contact at toll free no. 1800 22 55 33.

**For Alna Trading and Exports Limited**
**Sd/-**
**Mithun Patel**
**Company Secretary and Compliance Officer**

**Place : Mumbai**
**Date : July 28, 2026**



**asREC (India) Limited**

इमारत क्र. २ युनिट क्र. २०१-२०२ ए आणि २००-२०० बी तळमजला, सॉलिटअरी कॉपरेटिव्ह पार्क, अंधेरी घाटकोपर रोड, चाकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.

**परिशिष्ट-४-अ**

**लिलावासाठी सार्वजनिक सूचना स्थावर मालमत्तेची विक्री**

**(सुरक्षितता हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ९ सह वाचन केलेल्या नियम ८ (६) अन्वयें)**

एएसआरईसी (इंडिया) लि. ही एक सिक्युरिटायझेशन आणि मालमत्ता पुनर्रचना कंपनी (यापुढे एएसआरईसी म्हणून उल्लेखित) आहे आणि भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. सोबत दिनांक २५.०३.२०२१ रोजी केलेल्या हस्तांतरण करारानुसार कर्जदार खाते नावांची सुरक्षित धनको आहे. एएसआरईसी-पीएस १२/२०२०-२१ चे विश्वस्त म्हणून काम करत असताना, एएसआरईसीने मे. सेफ लाईफ फार्माकम प्रा. लि. (कर्जदार कंपनी), आणि श्री. शैलेश चिमनलाल पारेख (संचालक आणि संयुक्त कर्जदार), श्री. प्रितेश शैलेश पारेख (संचालक आणि संयुक्त कर्जदार) (यापुढे कर्जदार, गहाण ठेवणारे आणि जामीनदार म्हणून उल्लेखित) यांचे मूळ कर्ज, अंतर्निहित प्रतिभूतींसह, मूळ कर्जदाता, भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. कडून अधिग्रहित केले आहे.

भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लिमिटेड (असाइनर बँक) च्या अधिकृत अधिकाऱ्याने, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ SARFAESI आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम १३(२) अन्वये दिनांक ०८.०९.२०२१ रोजी एक मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये उपरोक्त सर्व कर्जदार / गहाण ठेवणारे / जामीनदार यांना त्यांच्या क्षमतेनुसार एकूण रु. . च्या थकबाकी रकमेच्या परतफेडीसाठी बोलावले होते. भारत को-ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. ने दिलेल्या आगाऊ रकमेपोटी, कर्जदार आणि संयुक्त / सह कर्जदारांना सदर कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत बजावलेल्या मागणी सूचनांमध्ये नमूद केलेल्या ६० दिवसांच्या विहित कालावधीत ३१.०८.२०२१ रोजी ११,०४,६१,९३६.९४ (अकरा कोटी चार लाख एकसष्ट हजार नऊशे चौऱ्याण्णव पैसे फक्त) पुढील व्याजासह देय आहेत. एकूण थकबाकीचा तपशील खालीलप्रमाणेः

| खात्यांचे नाव | रक्कम |
|---|---|
| मेसर्स सेफ लाईफ फार्माकिम प्रायव्हेट श्री शैलेश चिमणलाल पारेख (संचालक आणि संयुक्त कर्जदार), लिमिटेड, श्री प्रितेश शैलेश पारेख संचालक आणि संयुक्त कर्जदार) | (१) कॅश क्रेडिट खाते क्रमांक ००५२१३१०००००२३५ रु १०,२६,२२,१९३.४९ दिनांक ३१.०८.२०२१ रोजी, त्यावर ०१.०९.२०२१ पासून लागू होणाऱ्या १३.९०% प्रतिवर्ष दराने पुढील व्याज + २% प्रतिवर्ष दराने दंडात्मक व्याजासह. (ii) मुदत कर्ज खाते क्रमांक ००५२३३५१००००२१८ रु१३,७७,६८२.१५ ३१.०८.२०२१ रोजी रु. १३.९०% प्रति वर्ष दराने पुढील व्याज + त्यावर । २% प्रति वर्ष दराने दंडात्मक व्याज ०१.०९.२०२१ पासून लागू. (iii) कोविड एफआयटीएल खाते क्रमांक ००५२३४०१००००९२ रु.६४,६२,०६१.३० दिनांक ३१.०८.२०२१ रोजी, त्यावर ०१.०९.२०२१ पासून लागू होणारे । १३.९०% प्रतिवर्ष दराने पुढील व्याज + २% प्रतिवर्ष दराने दंडात्मक व्याज. |
| एकूण थकबाकी रक्कम | ३१.०८.२०२१ रोजी रु. ११,०४,६१,९३६.९४ |

कर्जदार, संयुक्त / सह कर्जदार/ भागीदार/जामीनदार / गहाण ठेवणारे यांनी उक्त कायद्याच्या कलम १३ (२) अन्वये दिनांक ०८.०९.२०२१ च्या मागणी सूचनेनुसार साठ दिवसांच्या विहित कालावधीत संपूर्ण देय रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि एएसआरईसी (India) Limited च्या बाजूने दिनांक २५.०३.२०२१ च्या उपरोक्त हस्तांतरण करारानुसार, एएसआरईसी (INDI) LTD च्या अधिकृत अधिकाऱ्याने, प्रतिभूती (व्याज) नियम, २००२ च्या अंमलबजावणीसह कलम १३ (४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या अनुसूचीतील मालमत्तांच्या संदर्भात, खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या तारण मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दिनांक ११.१२.२०२३ रोजी घेतला.

संपूर्ण देय रक्कम भरली न गेल्यामुळे, सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, संयुक्त / सह कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्राधिकृत अधिकारी, कलम १३ (२) च्या सूचनेनुसार उपरोक्त मागणीप्रमाणे खात्यातील देय रक्कम वसूल करण्यासाठी, उक्त सूचनेनंतर प्राप्त झालेल्या रकमेचे योग्य श्रेय देऊन, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये खाली नमूद केलेली तारण मालमत्ता विकू इच्छितात आणि म्हणून या तारण मालमत्तेच्या खरेदीसाठी सीलबंद लिफाफ्यात निविदा/ बोली मागविण्यात येत आहेत.

मे. सेफलाइफ फार्माकिम प्रा. लि. (कर्जदार कंपनी), आणि श्री. शैलेश चिमनलाल पारेख (संचालक आणि संयुक्त कर्जदार), श्री. प्रितेश शैलेश पारेख (संचालक आणि संयुक्त कर्जदार) यांच्याकडून सुरक्षित कर्जदाराला देय असलेल्या एकूण रु. ११,०४,६१,९३६.९४ (अकरा कोटी चार लाख एकसष्ट हजार नऊशे चौऱ्याण्णव पैसे फक्त) च्या वसुलीसाठी । मालमत्ता केवळ जशी आहे तशी, जशी आहे तशी, ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत आणि कोणताही दावा नाही या तत्त्वावर विकली जाईल. राखीव किंमत आणि अनामत रक्कम इत्यादी खाली दिलेले आहेत:

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखामध्ये ) | ई.एम. डी. (रुपये लाखांमध्ये) | बोली वाढीव मूल्य (रु. लाखांमध्ये) |
|---|---|---|---|
| सत्यम सीएचएस लि. या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या सी विंगमधील पहिल्या मजल्यावर, २४३५ चौरस फूट (कार्पेट एरिया) क्षेत्रफळाची व्यावसायिक जागा, ज्यामध्ये ५९४.१७ चौरस फूट क्षेत्रफळाचा मेझॅनिन फ्लोअर, मोकळी कार पार्किंगची जागा क्रमांक बी/४ व पी/२८ आणि स्टिल्ट कार पार्किंगची जागा क्रमांक बी/४ व बी/५ यांचा समावेश आहे. पत्ता: प्लॉट क्रमांक १०१७, सी.टी.एस. क्रमांक ८९५, डॉ. राजेंद्र प्रसाद रोडजवळ, अग्रवाल म्युनिसिपल हॉस्पिटलजवळ, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०००८० (मालक: मे. सेफलाइफ फार्माकम प्रा. लि.) | ६२९.१० | ६२.९१ | १.०० |

**लिलावाचे तपशील:**
लिलावाची तारीख व वेळ १४.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता
-मालमत्तेची पाहणी: दिनांक ०७.०८.२०२६ रोजी दुपारी ०१.०० ते सायंकाळी ०३.०० पर्यंत.
- निविदा अर्जाचे संकलन: दिनांक २८.०७.२०२६ ते १३.०८.२०२६ सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत.
- निविदा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दिनांक १३.०८.२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
- निविदा अर्ज गोळा करण्याचे/सादर करण्याचे ठिकाण: एएसआरईसी (इंडिया) लि. च्या कार्यालयातून,
पत्ता: २०१/२०२अ, इमारत क्र. २, सोलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चाकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३. निविदा अर्ज एएसआरईसी (इंडिया) लि. च्या वेबसाइटवरून (www.asrecindia.co.in) देखील डाउनलोड करता येतील. लिलावाचे ठिकाण आणि बोली उघडणे : एएसआरईसी कडे प्राप्त झालेल्या प्रस्ताव / निविदा, अधिकृत अधिकाऱ्याद्वारे आमच्या वर नमूद केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर दिनांक १४.०८.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडल्या जातील, । जिथे आपापसातील बोली होऊ शकते.

**अटी व शर्ती:**
१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार आणि माहितीनुसार, बिल क्रमांक -- बिल / ६३५१ अन्वये, २५.०९.२०२५ पर्यंतची सोसायटीची थकबाकी रु. ३४, १४, ७१५/- असून, त्याव्यतिरिक्त देय तारखेपर्यंतची थकबाकी व्याजासह सोसायटी देखभाल शुल्क देय आहे आणि प्राधिकृत अधिकाऱ्याला ज्ञात असलेले मालमत्तेवर इतर कोणतेही बोजे नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी, लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालकी हक्क आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे हक्क देयके यांसंबंधी स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. सार्वजनिक लिलावाची जाहिरात । ही एएसआरईसी ची कोणतीही वचनबद्धता किंवा कोणतेही प्रतिनिधित्व नाही आणि तसे मानले जाणार नाही. ही मालमत्ता एएसआरईसी ला ज्ञात किंवा अज्ञात असलेल्या सर्व विद्यमान बोज्यांसह विकली जात आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी/ हक्कांसाठी / मतांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.
२. वर नमूद केलेल्या संपूर्ण मालमत्तेचा लिलाव जशी आहे तशी, जे आहे ते, जे काही आहे ते आणि जे काही आहे ते या तत्त्वावर आणि कोणताही दावा न करण्याच्या आधारावर आयोजित केला जाईल.
३. निविदा दस्तऐवजात दिलेल्या विहित नमुन्यातील निविदा, एएसआरईसी (इंडिया) इमारत क्र. २ युनिट क्र. २०१-२०२ ए आणि २००-२०० बी तळमजला, सॉलिटअरी कॉपरेटिव्ह पार्क, अंधेरी घटिकोपर रोड, चाकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९
३. येथील प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावी किंवा harshad@asrecindia.co.in/jaganathrao@asrecindia.co.in या ईमेलद्वारे । पाठवावी. दिनांक १३.०८.२०२६ रोजी सायंकाळी ४:०० नंतर कोणत्याही कारणास्तव प्राप्त झालेला निविदा अर्ज किंवा अनामत रक्कम (EMD) विचारात घेतली जाणार नाही. अनामत रकमेविना (EMD) निविदा तात्काळ । नाकारण्यात येईल.
४. यशस्वी बोली लावणाऱ्याची अनामत रक्कम (ईएमडी) विक्री मूल्याचा भाग म्हणून ठेवली जाईल आणि अयशस्वी बोली लावणाऱ्यांची ईएमडी त्याच प्रकारे परत केली जाईल. ईएमडीवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. जलद आणि योग्य परतावा सुलभ करण्यासाठी बोली लावणाऱ्यांना त्यांच्या बँक खात्याचा तपशील देण्याची विनंती आहे.
५. यशस्वी बोली लावणाऱ्याने ताबडतोब, म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवसाच्या आत, विक्री किमतीच्या २५% रक्कम (अनामत ठेव रकमेसह) अधिकृत अधिकाऱ्याकडे जमा करावी आणि अशी रक्कम जमा न केल्यास, अनामत ठेव जप्त केली जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल.
६. विक्री किमतीची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीची पुष्टी झाल्याच्या ३० व्या दिवसापर्यंत किंवा सुरक्षित कर्जदार आणि यशस्वी बोलीदार यांच्यात लेखी स्वरूपात ठरलेल्या वाढीव कालावधीत अदा केली जाईल. वर नमूद केलेल्या कालावधीत रक्कम भरण्यात कसूर झाल्यास, ठेव जप्त केली जाईल आणि । मालमत्ता पुन्हा विकली जाईल. तसेच, कसूरदार खरेदीदार मालमत्तेवरील किंवा त्यानंतर ती ज्या रकमेला विकली जाईल, त्या रकमेच्या कोणत्याही भागावरील आपले सर्व हक्क गमावेल.
७. ही विक्री सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विहित केलेल्या नियमांच्या / अटींच्या अधीन असेल. ८. ईएमडी रकमेशिवाय आणि / किंवा राखीव किंमतीपेक्षा कमी असलेली बोली स्वीकारली / पुष्टी केली जाणार नाही.
९. इच्छुक खरेदीदार / बोली लावणाऱ्यांनी ईएमडी रक्कम बँक ऑफ इंडिया, एसएसआय, अंधेरी शाखा, आयएफएससी कोड: BKID0000090, लाभार्थीचे नाव: SREC PS-12/2020-21 ट्रस्ट येथील खाते क्रमांक: 009020110001517 द्वारे किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेवर काढलेल्या आणि मुंबईत देय असलेल्या ASREC-PS- 12/2020-21 ट्रस्टच्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करणे आवश्यक आहे.
१०. इच्छुक बोलीदार दिनांक ०७.०८.२०२६ रोजी दुपारी ०१.०० ते ०३.०० या वेळेत मालमत्तेची पाहणी करू शकतात. कोणत्याही प्रश्नासाठी श्री. हर्षद गरुडे (मोबाइल नं. ९५९४६९२२५१, ०२२-६१३८७०६०), श्री. जगदीश शाह मोबाइल नं. ७०२१४२८३३६, ०२२-६१३८७०४२) यांच्याशी संपर्क साधू शकता.
११. प्राधिकृत अधिकाऱ्यास कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि/किंवा कोणत्याही अटी / शर्तीमध्ये बदल करण्याचा पूर्ण अधिकार आहे.
१२. यशस्वी निविदाकाराला नोंदणी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, अनुषंगिक खर्च इत्यादी, कायद्यानुसार लागू असल्याप्रमाणे १३. विक्रीच्या अटी व शर्तींची पूर्तता झाल्यावर आणि विक्रीची पुष्टी झाल्यावर, प्राधिकृत अधिकारी यशस्वी बोली लावणाऱ्याच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी करतील.
१४. यशस्वी बोली लावणाऱ्याने सोसायटीची थकबाकी भरल्यानंतरच, मालमत्तेची नोंदणी यशस्वी बोली लावणाऱ्याच्या नावे विमा उप-निबंधक कार्यालयात केली जाईल.
१५. जर वर नमूद केलेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाल्यास, एएसआरईसी ला या सूचनेद्वारे लिलावाखालील तारण ठेवलेली मालमत्ता खाजगी कराराद्वारे किंवा सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियमआणि SARFAESIकायदा, २००२ च्या नियम ८ (५) च्या तरतुदींनुसार विकण्याचा अधिकार आहे. १६. सर्वोच्च बोली ही तारण ठेवलेल्या धनको / अधिकृत अधिकाऱ्याच्या मंजुरीच्या अधीन असेल. ही नोटीस, सरफेसी कायद्याच्या नियम ८ ( ६ ) आणि ९ (१) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमांनुसार सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी कर्जदार आणिसंयुक्त / सह कर्जदार / जामीनदार यांना, जर त्यांची थकबाकी पूर्णपणे भरली गेली नसेल तर, वर नमूदकेलेल्या तारखेला १५ (पंधरा) दिवसांची नोटीस म्हणून काम करेल.

सही/-
अधिकृत अधिकारी,
एएसआरईसी (इंडिया) लि.

दिनांक: २८.०७.२०२६
ठिकाण: मुंबई